महाराष्ट्र शासन

# सर्वांगिण विकासाच्या पाऊल खुणा...





## पाऊल पडते पुढे



- नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी मुंबई,नागपूर, आणि पुणे येथे वसतिगृह.
- मागासवर्गीय विद्यार्थीनींसाठी ५० वसतिगृहे नव्याने उभारण्याचा निर्णय.
- औद्योगिक वसाहतीमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द उद्योजकांसाठी राखीव भूखंड.
- अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या १२३ अपंग शाळांना अनुदान तत्वावर मान्यता.
- जात पडताळणीसाठी जिल्हानिहाय जात पडताळणी समिती.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व विकास.
- लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिक्षण घेताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य राहिलेल्या ऐतिहासिक घराची खरेदी.
- संविधान दिनानिमित्त नागपूरात १.२५ लाख नागरिकांच्या सहभागातून संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन.
- राज्य विधीमंडळाच्या सभागृहांत संविधान आणि डॉ.आंबेडकर यांचेवर एक दिवस चर्चा.
- प्रत्येक जिल्ह्यात बेरोजगार तरुणांसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण.
- अनुसूचित जाती प्रवर्गातील युपीएससीच्या परीक्षार्थींसाठी औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र.
- दिल्लीत नामांकित साईराम-वाजीराम सारख्या केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण.
- छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने शिष्यवृत्ती.
- अनुसूचित जातीतील ५० महिलांना एम.फिल व पी.एच.डी साठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने फेलोशिप.
- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावानेही एम.फिल व पी.एच.डी च्या उच्च शिक्षणाकरीता ५० विद्यार्थ्यांसाठी फेलोशिप.
- कौशल्य विकासांतर्गत एअरहोस्टेससाठी प्रशिक्षण, त्यामध्ये ३४ मुलींची निवड.
- पाली-तिपिटकचे मराठी भाषांतर करण्याचा निर्णय.
- वाल्मिकी समाजासाठी लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्क लागू.
- दिव्यांग (अपंग) यांच्या समन्वयासाठी राज्यस्तरीय समन्वय समिती गठीत.
- शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण समिती.
- अपंगांच्या उत्पादित वस्तू शासकीय कार्यालयांनी प्राधान्याने खरेदी करण्याबाबतचा निर्णय.
- अपंगांच्या अनुदानित, विनाअनुदानित खासगी विशेष शाळा किंवा कर्मशाळेतील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसास जिल्ह्यातील कोणत्याही शाळेतील रिक्त पदावर नियुक्ती.
- दिव्यांगांना कृत्रिम अवयव व साधनांचा पुरवठा. दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके.
- समाज कल्याण संस्थांना अनुदाने (समाजकार्य महाविद्यालये) व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना.



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

- विभागीय तसेच जिल्हा स्तरावर शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात असल्याने तेथे विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे वसतीगृहामध्ये सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना.
- वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी अनुदान योजना.
- इयत्ता दहावी नंतरच्या व्यावसायिक, बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लाभ. भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधेसाठी रक्कम मिळणार.
- अनुसूचित जाती, नवबौद्ध विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधेसाठी रक्कम मिळणार.
- विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा होणार.
- या योजने अंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता ३२ हजार, निवास भत्ता २० हजार, निर्वाह भत्ता ८ हजार, असे प्रती विद्यार्थी संभाव्य वार्षिक खर्च रु. ६० हजार देण्यात येतो. इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता २८ हजार, निवास भत्ता १५ हजार, निर्वाह भत्ता ८ हजार, असे प्रती विद्यार्थी संभाव्य खर्च रु. ५१ हजार देण्यात येतो.
- इतर जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्यांसाठी भोजन भत्ता २५ हजार, निवास भत्ता १२ हजार, निर्वाह भत्ता ६ हजार, असे प्रती विद्यार्थी संभाव्य वार्षिक खर्च रु. ४३ हजार मदत देण्यात येते .
- या व्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी ५ हजार व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी रु. २ हजार, शैक्षिणिक साहित्यासाठी रोख स्वरुपात मदत.
- विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध या प्रवर्गातील तसेच महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- विद्यार्थ्यांच्या पालकाची उत्पन्न मर्यादा रु. २.५० लाख पेक्षा जास्त नसावी.
- विद्यार्थ्यास किमान ५० टक्के गुण असणे अनिवार्य.
- या योजनेस खास बाब सवलत लागू नसून विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेवर करण्यात येईल.

## • राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना (देशांतर्गत अभ्यासासाठी शिष्यवृत्ती)

राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसहित) विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी विशेष योजना. देशातील मान्यताप्राप्त नामांकित संस्थामधील पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (आयटीआयमधील प्रिपररेटरी कोर्स वगळून) पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी

शिष्यवृत्ती.

- पात्र विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी शुल्क, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादीचे शुल्क मिळणार.
- वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजनसहित सर्व शुल्क मिळणार तसेच वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अनुदान मिळणार. अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी ५ हजार व शैक्षणिक साहित्य तसेच इतर शैक्षणिक खर्चासाठी ५ हजार असे एकूण १० हजार रुपये.
- सर्व अनुदान विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यात मिळणार.
- पालकांचे उत्पन्न सहा लाखांच्या आत असलेल्या व राज्यातील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना लाभ.
- गुणांच्या टक्केवारीनुसार विद्यार्थ्यांची निवड
- अर्ज व इतर माहितीसाठी आयुक्त, समाज कल्याण, यांच्याकडे संपर्क साधावा.

## वसतिगृहाची सुविधा

मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे म्हणून मुलींसाठी विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा व तालुकास्तरावर ४३ नवीन शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय. स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये प्रवेशित मुलींसाठी ५ जागा गुणवत्तेनुसार राखीव. शासकीय, निमशासकीय, खासगी इत्यादी प्राधिकरणात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांकरीता मुंबई, पुणे व नागपूर येथे प्रत्येकी एक शासकीय वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय.

## मुलां-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे

- मागासवर्गीय मुलां-मुलींना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू.
- महाराष्ट्रात विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर ३८१ वसतिगृहे मंजूर. त्यांपैकी ३७७ शासकीय वसतिगृहे कार्यान्वित. त्यामध्ये ३५५३० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ.
- संपर्क : संबंधित जिल्ह्याचे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण/ संबंधित विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण/ संबंधित गृहपाल , मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह.



## • विभागीयस्तरावर उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था

- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू. संचालक,



व्यवसाय व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत संनियंत्रण.

अभ्यासक्रम : मेकॅनिकल, मेडिकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिक यांत्रिक मोटार गाडी, फॅशन टेक्नॉलॉजी (मुलींकरीता), डेंटल लॅब टेक्निशियन, क्राप्ट्मन फूड प्रॉडक्शन (जनरल), डाटा एन्ट्री ऑपरेटर (मुलींकरिता), ऑपरेटर ॲडव्हान्स मशीन टुल, मेकॅनिक-कॉम्प्युटर हार्डवेअर, इंटिरिअर डेकोरेशन अँड डिझाइनिंग, हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर, नेटवर्क टेक्निशियन, ड्रायव्हर कम मेकॅनिक संपर्क : संबंधित प्रादेशिक उपायुक्त ,समाज कल्याण, संबंधित औद्योगिक संस्थेचे प्राचार्य.

## परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये पदव्युत्तर व पी.एच.डी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश मिळाला आहे, अशा ५० विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती. विद्यापीठाच्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो. विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता व विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

संपर्क : जाहिरातीद्वारे दरवर्षी मे महिन्यात अर्ज मागविण्यात येतात, आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे

## तालुका स्तरावर १०० शासकीय निवासी शाळा

- अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध मुलींकरिता प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय. ३५३ शासकीय निवासीशाळा पैकी प्रथम टप्प्यात १०० शासकीय निवासी शाळा सुरू करण्यास मंजूरी. त्यापैकी ८० निवासी शाळा सुरू. या शाळेमध्ये इ. ६ वी ते १० वी पर्यंतच्या मुलां-मुलींना प्रवेश.
- संपर्क : संबंधित जिल्ह्याचे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त.

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

वर्षातून तीन वेळा म्हणजे २६ जून,२२ सप्टेंबर आणि ३ जानेवारी या तारखांना शिष्यवृत्ती देण्यात येतात. ५ वी ते ७ वी करिता दरमहा ६० रुपये दहा महिन्यांसाठी. ८ वी ते १० वी करिता दरमहा १०० रुपये १० महिन्यांसाठी.

संपर्क : जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प./ शाळेचे मुख्याध्यापक



## मातोश्री वृद्धाश्रम योजना

- वृद्धांना वृद्धापकाळात राहण्याची व जेवणाची सोय व्हावी याकरीता प्रत्येक जिल्ह्यात वृद्धाश्रमाच्या धर्तीवर सुसज्ज असे मातोश्री वृद्धाश्रम योजना मुंबई व्यतिरिक्त ३० जिल्ह्यांमध्ये सुरु करण्याचा निर्णय.

**आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम-२०१० :-** राज्य शासनाने आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० तयार केला आहे. या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य परिषद व जिल्हा समिती गठीत.

- **जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती :-** जिल्हा दंडाधिकारी नियम २३ अन्वये सदर समिती गठीत. जिल्हास्तरावर अधिनियमाच्या प्रभावी तथा समन्वित अंमलबजावणीसाठी आणि सल्ला देण्यासाठी प्रत्येक जिल्हाकरिता ज्येष्ठ नागरिकांची जिल्हा समिती स्थापन करेल.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई

- कर्ज अनुदान योजनेअंतर्गत रु. ५०,०००/- पर्यंत गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायांना आर्थिक सहाय्य. बीज भांडवल योजनेअंतर्गत रु. ५ लाखापर्यंत गुंतवणुक असणारे प्रकल्प विचारात.
- प्रशिक्षण योजना- विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार करण्याचे दृष्टीने प्रशिक्षण

## • साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या)

महामंडळामार्फत विशेष केंद्रीय अर्थ सहाय्य योजना, बीज भांडवल योजना, मुदत कर्ज योजना, लघुऋण वित्त योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक कर्ज योजना, अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती या योजना राबवल्या जातात. संपर्क : ०२२-२५२२०००८ संकेतस्थळ - www.lasdc.com

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या)

महामंडळामार्फत मार्फत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदान योजना, बीज भांडवल आणि प्रशिक्षण या योजना तर राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (नवी दिल्ली) यांच्या मुदती कर्ज, सूक्ष्म पत पुरवठा, महिला समृद्धी, महिला किसान, शैक्षणिक कर्ज या योजना राबवल्या जातात. संपर्क : २२०४ ४१८६, २२०४ ७१५७ संकेतस्थळ : www.charmodhyog.com

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या)

महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज, थेट कर्ज, अनुदान, विद्यावेतन या योजना राबवल्या जातात.
संपर्क : ०२२-२६२०२५८८/ २६२०२५८६ संकेत स्थळ : www.vnvjntdc.com

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

महामंडळामार्फत थेट कर्ज व २०% बीज भांडवल कर्ज योजना राबविल्या जातात. त्याचबरोबर या महामंडळामार्फत राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ (नवी दिल्ली) यांच्या मुदती कर्ज, ४५% मार्जिन मनी, महिलांसाठी स्वर्णिमा, शैक्षणिक कर्ज, सूक्ष्म पतपुरवठा आणि महिला समृध्दी योजना राबवल्या जातात. संपर्क : ०२२ – २५२७ ५३७४
संकेतस्थळ :- www.msobcfdc.gov.in

## महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ (मुंबई)

महामंडळामार्फत राज्य शासनाची वैयक्तिक थेट कर्ज योजना व सेवा व व्यापार क्षेत्रातील छोट्या धंद्यासाठी कर्जसहाय्य, शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज योजना, वाणिज्यिक वापरासाठी वाहन खरेदी करण्यासाठीची कर्ज योजना, मानसिक विकलांग (मनोरुग्ण) सेरेब्रल पाल्सी आणि (ऑटीझम) आत्ममग्न अशा अपंगांसाठी स्वयंरोजगार योजना, लघु उद्योग उभारणीसाठी कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना, सूक्ष्म वित्त सहाय्य योजना, प्रशिक्षण योजना, मतिमंद व्यक्तीच्या पालकांच्या संस्थांसाठी आर्थिक सहाय्य योजना, युवा स्वावलंबन या राष्ट्रीय महामंडळाच्या योजना राबवल्या जातात.

## अपंग-अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य

किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराने अपंगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास या योजनेतून पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य. रक्कम रूपये २५०००/- चे बचत प्रमाणपत्र, रूपये २००००/- रोख स्वरूपात. रूपये ४५००/- संसार उपयोगी साहित्य/वस्तू खरेदीसाठी. रूपये ५०० स्वागत समारंभ कार्यक्रम खर्चासाठी. संपर्क : जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण





## रमाई आवास (घरकूल) योजना

- अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या जागेवर २६९ चौरस फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी रमाई आवास घरकुल योजना सन २००९-१० पासून सुरू.
- पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत रमाई आवास योजनेतील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील घरकुलासाठी पात्र असणाऱ्या परंतु जागा उपलब्ध नसणाऱ्या लाभार्थ्यांना जागा खरेदी करिता रु. ५०,०००/-पर्यंत अर्थसहाय्य.
- अनुसूचित जातींमधील जे अपंग लाभार्थी दारिद्रय रेषेखाली नाहीत, ज्याचे अंपगत्व ४०% पेक्षा अधिक आहे व वार्षिक उत्पन्न एक लाखापर्यंत आहे, अशा अपंग लाभार्थ्यांना, ते योजनेच्या उर्वरित अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास त्यांना रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ देण्याचा निर्णय.
- संपर्क : संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण / जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद / आयुक्त महानगरपालिका (संबंधित)

## • सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेट मनी इत्यादीवर होणाऱ्या संपुर्ण खर्चाची प्रतिपुर्ती. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रति विद्यार्थी प्रतिवर्षी रु.१५०००/- शिष्यवृत्ती. संपर्क : संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण / सैनिक शाळेचे प्राचार्य.

प्रकाशक: जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस,
शहिद भगतसिंग मार्गफ़ोर्ट, मुंबई - ४०० ००१,
संपर्क: ०२२-२२६६२४४०
संपर्क : सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर